Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

बेकायदेशीर फिल्टर प्लांटमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका

(पान २ वर)



। रविवार, दि. २४ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४९ । पाने २। DIGITAL EDITION

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ विधान परिषद जागांसाठी राजकीय हालचाली तीव्र

# जळगाव विधान परिषद जागेसाठी हालचालींना वेग!

### जळगावची जागा शिवसेनेला मिळावी यासाठी प्रयत्न | प्रतापराव पाटील यांच्या उमेदवारीची चर्चा रंगली

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोट्यातील १७ विधान परिषद जागांसाठी निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून महायुतीत जागावाटपावरून मोठी रस्सीखेच पाहायला मिळत आहे. अशातच जळगाव विधान परिषद जागेसाठी शिवसेनेचे नेते व राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी जोरदार फिल्डिंग लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**

आपल्या चिरंजीव प्रतापराव पाटील यांच्या उमेदवारीसाठी त्यांनी जळगावची जागा शिवसेनेला मिळावी, अशी मागणी केल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. दरम्यान, जळगावातील एक कार्यक्रम अर्धवट सोडून मंत्री गुलाबराव पाटील तातडीने मुंबईकडे रवाना झाल्याने चर्चांना अधिक उधाण आले आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील नेत्यांमध्ये महत्त्वाच्या बैठका सुरू असल्याने या दौऱ्याकडे विशेष लक्ष लागले आहे. जळगावात गुर्जर समाजाच्या कार्यक्रमाला उपस्थित असताना मंत्री गुलाबराव पाटील यांनी अचानक कार्यक्रम अर्धवट सोडून मुंबईकडे प्रयाण केले. त्यामुळे राजकीय वर्तुळात



विविध तर्क-वितर्कांना उधाण आले. जळगाव विधान परिषद जागेबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा करण्यासाठीच ते मुंबईला रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.महायुतीत विधान परिषद जागांच्या वाटपावरून सध्या मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू आहेत. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात समन्वय बैठका सुरू असून प्रत्येक पक्ष आपापल्या जागांसाठी जोरदार प्रयत्न करत आहे. जळगाव विधान परिषद जागेसाठी मंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या चिरंजीव प्रतापराव पाटील यांच्या नावासाठी आग्रही भूमिका घेतल्याची माहिती आहे. जळगाव जिल्ह्यातील शिवसेनेचे आमदार आणि पदाधिकारीही ही जागा शिवसेनेलाच मिळावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचे बोलले जात आहे. याच पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात विधान परिषद जागांबाबत चर्चा झाल्याचेही समोर आले आहे. पुढील दोन दिवसांत होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सोमवारपासून अर्ज प्रक्रिया सुरूविधान परिषद निवडणुकीसाठी सोमवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होत आहे. राज्यातील राजकीय हालचालींना अधिक वेग आला असून इच्छुक उमेदवारांकडून लॉबिंग सुरू झाले आहे.

### 7 जागांसाठी एकनाथ शिंदे आग्रही

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विधान परिषदेच्या 17 पैकी 7 जागांसाठी एकनाथ शिंदे आग्रही आहेत. काल सकाळी नंदनवन इथे मंत्री बावनकुळे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सोबत बैठक झाली होती. यानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती. सध्या समोर आलेल्या माहितीनुसार ठाणे, संभाजीनगर, जालना, नाशिक या जागेचा काढा कायम असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष करून ठाण्याच्या जागेसाठी शिंदे आग्रही असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे दिल्लीत पक्ष नेतृत्वाकडे विधान परिषदेच्या जागांचा तिढा सुटणार का ? हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.राज्यातील विधान परिषद निवडणुकीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोट्यातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. खासकरून जागावाटपाचा तिढा अजूनही सुटलेला नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार काही जागांवर सर्व पक्षांचे एकमत झालेले आहे, मात्र काही जागांवर शिवसेना आणि भाजप अशा दोन्ही पक्षांनी दावा केल्याची माहिती समोर आली आहे. अशातच आता जागा वाटपाचा तिढा दिल्ली दरबारी सुटणार असल्याची माहिती समोर आली आहे, कारण एकनाथ शिंदे तडकाफडकी दिल्लीला रवाना झाले आहेत.

---

**» Selected**

## वरणगावात मविआचे चक्काजाम आंदोलन

वरणगाव | प्रतिनिधी भुसावळ तालुक्यातील वरणगाव शहरात महाविकास आघाडीच्या वतीने शुक्रवारी केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलची कृत्रिम टंचाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारविरोधात संताप व्यक्त केला. शहरातील तिरंगा सर्कल परिसरात हे आंदोलन पार पडले. महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन आंदोलनकर्त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी केली. वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले असून, महागाईमुळे घरगुती खर्च मोठ्या प्रमाणावर वाढल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

---

**जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज**

## धुळ्यात तरुणावर प्राणघातक हल्ला

### धारदार शस्त्राने डोक्यावर वार

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे शहरात मध्यरात्रीच्या सुमारास एका तरुणावर टोळक्याकडून प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुरत-नागपूर महामार्गावरील हॉटेल भंडारा परिसरात झालेल्या या हल्ल्यात धारदार शस्त्राने डोक्यावर वार करण्यात आल्याने तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर धुळ्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी आरोपींविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जखमी तरुणाने केली आहे. राहुल शेलार (वय ३०, रा. श्रीराम नगर, चितोड रोड, धुळे) असे जखमी तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राहुल शेलार हे मध्यरात्री मित्रांसोबत हॉटेलमध्ये जेवण करून घराकडे परतत होते. त्यावेळी काही युवकांनी त्यांना अडवून “तू सुमित शिंदे आणि त्यांच्या मित्रांमध्ये का राहतो?” असा जाब विचारत शिवीगाळ सुरू केली. यानंतर चार ते पाच जणांच्या टोळक्याने राहुल शेलार यांच्यावर अचानक हल्ला चढवला. हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने त्यांच्या डोक्यावर वार केल्याने ते गंभीर जखमी झाले. मित्रांनी पळ काढल्याने बचाव



हल्ल्यावेळी राहुल शेलार यांच्यासोबत असलेल्या मित्रांनी घटनास्थळावरून पळ काढल्याने त्यांचा जीव वाचला. मात्र राहुल शेलार यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. साळे यांच्यावर आरोप हा हल्ला निलेश देवरे, शुभम साळे यांच्यासह इतरांनी केल्याचा आरोप जखमी तरुणाने केला आहे.

### पोलीस कारवाईवर प्रश्नचिन्ह

पोलिसांनी अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली नसल्याचा आरोप जखमी तरुणाने केला आहे.” असा संतप्त सवाल राहुल शेलार यांनी उपस्थित केला. दरम्यान, शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींविरोधात कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

---

## धरणगाव स्टेशन विकासासाठी DRUCC ची मुंबईत बैठक; अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा!

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव आणि तापी सेक्शनमधील रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत २१ मे २०२६ रोजी मुंबई सेंट्रल येथे DRUCC (डिव्हिजनल रेल्वे यूजर्स कन्सल्टेटिव्ह कमिटी) सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत धरणगाव रेल्वे स्टेशनच्या विकासकामांबाबत तसेच प्रवासी सुविधांबाबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. DRUCC सदस्य महेंद्र एस. कोठारी यांनी धरणगाव स्टेशनवरील प्रलंबित कामे आणि प्रवाशांच्या अडचणींबाबत रेल्वे प्रशासनासमोर विविध मागण्या मांडल्या. वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांसोबत चर्चा बैठकीला मंडल रेल प्रबंधक पंकज सिंह यांच्यासह ऑपरेशन आणि कमर्शियल विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी धरणगाव स्टेशनवर सुरू असलेल्या विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. प्रवाशांच्या सुरक्षितता, सुविधा आणि रेल्वे



वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. धरणगाव स्टेशनसाठी ७ महत्त्वाच्या मागण्या DRUCC सदस्य महेंद्र कोठारी यांनी बैठकीत धरणगाव स्टेशनच्या विकासासाठी सात महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. त्यामध्ये — आषाढी वारीसाठी उधना-पंढरपूर स्पेशल ट्रेनच्या ५ ते ७ फेऱ्या सुरू करणे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी नवीन फूट ओव्हर ब्रिज (FOB) उभारणे स्टेशन परिसरात CCTV कॅमेरे बसविणे MEMU ट्रेनमध्ये स्लीपर कोचची सुविधा उपलब्ध करणे अमृत भारत एक्सप्रेसला दैनिक सेवा देणे कोयंबतूर-जयपूर एक्सप्रेसला धरणगाव येथे थांबा देणे चेन्नई-भगत की कोठी एक्सप्रेसला धरणगाव स्टेशनवर थांबा मंजूर करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. प्रवासी सुविधांना मिळणार गती? धरणगाव स्टेशनच्या वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर या मागण्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. विशेषतः CCTV, FOB आणि अतिरिक्त रेल्वे थांबे यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धरणगाव स्टेशनच्या कायापालटाची अपेक्षा प्रवाशांच्या सोयी-सुविधा आणि रेल्वे विकासाच्या दृष्टीने ही बैठक फलदायी ठरल्याचे मानले जात असून, धरणगाव रेल्वे स्टेशनचा कायापालट करण्यासाठी आता रेल्वे प्रशासन ठोस पावले उचलेल, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

---

## डांबून ठेवलेल्या १० ऊसतोड मजुरांची सुटका

### सोलापूरहून पुणे-दौंड वीटभट्टीवर नेल्याचा आरोप

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** लोणवाडी येथील आदिवासी भिल्ल समाजातील १० ऊसतोड कामगारांना करार पूर्ण झाल्यानंतरही घरी येऊ न देता जबरदस्तीने पुणे जिल्ह्यातील दौंड परिसरातील वीटभट्टीवर कामासाठी डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

प्रशासन आणि आदिवासी टायगर सेनेच्या पुढाकाराने अखेर या मजुरांची सुटका करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, लोणवाडी गावातील दिपक महेश भिल, मंगल देवसिंग भिल, मिराबाई



देवसिंग भिल, पिंटू गणसिंग भिल, रत्नाबाई पिंटू भिल, गणसिंग सोनू भिल, महेश आत्माराम भिल, वंदनाबाई महेश भिल, दिपक मिना भिल आणि दिपक देवसिंग भिल हे मजूर सोलापूर येथे ऊसतोडीच्या कामासाठी गेले होते. या मजुरांचा चार महिन्यांचा करार करण्यात आला होता. मात्र कराराची मुदत पूर्ण होऊनही त्यांना घरी परतू देण्यात येत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित मुकादम आणि मालकांनी काही पैशांच्या व्यवहारातून या मजुरांना पुणे जिल्ह्यातील दौंड परिसरातील वीटभट्टीवर परस्पर पाठविल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मजुरांकडून इच्छेविरुद्ध काम करून घेतले जात असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेची माहिती आदिवासी टायगर सेनेचे पदाधिकारी विनोद मोरे यांना मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासनाशी संपर्क साधला. त्यानंतर प्रशासनाच्या मदतीने पुणे-दौंड येथे रेस्क्यू मोहीम राबविण्यात आली. रेस्क्यू पथकाने संबंधित ठिकाणी जाऊन सर्व मजुरांची सुखरूप सुटका केली. त्यानंतर त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या गावी परत आणण्यात आले. दरम्यान, या घटनेमुळे ऊसतोड कामगारांच्या शोषणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून संबंधित मुकादम आणि मालकांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

---

## लग्न लावून न दिल्याच्या रागातून मुलानेच आईला जिवंत जाळले

### धुळ्यातील महिंदळे गाव हादरले

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे| प्रतिनिधी :** धुळे तालुक्यातील महिंदळे गावात मानवी नातेसंबंधाला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. लग्न लावून देत नसल्याच्या रागातून मद्यधुंद मुलाने स्वतःच्या वृद्ध आईलाच जिवंत पेटवून दिल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेत गंभीर भाजलेल्या आईचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे. जिजाबाई खैरनार (वय ६५) असे मृत वृद्ध महिलेचे नाव असून, प्रदीप खैरनार ऊर्फ दगडू खैरनार (वय ४५, रा. महिंदळे, धुळे) असे आरोपी मुलाचे नाव आहे. तालुका पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप खैरनार हा रिक्षा चालवून उदरनिर्वाह करतो. गेल्या काही दिवसांपासून तो आपल्या आईकडे लग्नासाठी सतत तगादा लावत होता. मात्र आई त्याच्या लग्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा गैरसमज त्याच्या मनात निर्माण झाला होता. याच कारणावरून मायलेकांमध्ये वारंवार वाद होत होते. घटनेच्या रात्री जिजाबाई खैरनार या मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास अंगणात बसून मुलाची वाट पाहत होत्या. त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत घरी परतलेल्या प्रदीपने पुन्हा लग्नाच्या विषयावरून आईशी वाद घालण्यास सुरुवात केली. शाब्दिक वाद विकोपाला गेल्यानंतर संतप्त झालेल्या प्रदीपने ज्वलनशील पदार्थ आईच्या अंगावर टाकून तिला पेटवून दिल्याचा आरोप आहे. या घटनेत जिजाबाई गंभीर भाजल्या. त्यांच्या आरडाओरडीनंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.



या अमानुष घटनेनंतर महिंदळे गावात शोककळा पसरली असून जन्मदात्या आईवरच मुलाने असा क्रूर हल्ला केल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तालुका पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली

गेल्या काही दिवसांपासून तो आपल्या आईकडे लग्नासाठी सतत तगादा लावत होता. मात्र आई त्याच्या लग्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा गैरसमज त्याच्या मनात निर्माण झाला होता. याच कारणावरून मायलेकांमध्ये वारंवार वाद होत होते. घटनेच्या रात्री जिजाबाई खैरनार या मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास अंगणात बसून मुलाची वाट पाहत होत्या. त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत घरी परतलेल्या प्रदीपने पुन्हा लग्नाच्या विषयावरून आईशी वाद घालण्यास सुरुवात केली. शाब्दिक वाद विकोपाला गेल्यानंतर संतप्त झालेल्या प्रदीपने ज्वलनशील पदार्थ आईच्या अंगावर टाकून तिला पेटवून दिल्याचा आरोप आहे. या घटनेत जिजाबाई गंभीर भाजल्या. त्यांच्या आरडाओरडीनंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

---

**जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज**

## महागाईविरोधातशिवसेनेचे आगळेवेगळे आंदोलन

### ‘मेलोडी चॉकलेट’ वाटप करत केंद्र सरकारवर निशाणा;पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या निषेधार्थ आंदोलन

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी :** देशभरात पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस सिलिंडर तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडत असताना, धरणगाव येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने महागाईविरोधात एक आगळेवेगळे आणि लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. पारंपरिक आंदोलनांना फाटा देत “मेलोडी चॉकलेट” वाटपाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदवण्यात आला.

शनिवारी सायंकाळी सुमारे ७ वाजेच्या सुमारास क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले उड्डाण पुलाखालील कीकाभाई मुल्ला कादरभाई सन्स यांच्या भारत पेट्रोलियम पंपावर



पेट्रोल-डिझेलचा टँकर दाखल होताच शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलनाला सुरुवात केली. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत केंद्र सरकारच्या महागाईविषयक धोरणांचा निषेध करण्यात आला. महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांवर वाढत चाललेला आर्थिक ताण, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांचा दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या वाढत्या किंमती यावर आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, आंदोलनादरम्यान उपस्थित नागरिक, पेट्रोल पंपाचे मालक, व्यवस्थापक, कर्मचारी तसेच टँकर चालक व वाहक यांना “मेलोडी चॉकलेट” वाटप करून निषेध व्यक्त करण्यात आला. या अनोख्या आंदोलनामुळे परिसरात उत्सुकता निर्माण झाली असून नागरिकांमध्येही याची मोठी चर्चा रंगली. यावेळी शिवसेना उपनेते तथा संपर्क प्रमुख गुलाबराव वाघ यांनी केंद्र सरकारवर टीका करत सांगितले की, पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात सातत्याने वाढ होत असून त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होत आहे. महागाई नियंत्रणात आणण्यात केंद्र सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

तर युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक निलेश चौधरी यांनी सांगितले की, सध्या शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीत व्यस्त असून मशागत आणि पेरणीपूर्व कामांसाठी डिझेलची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. मात्र, इंधन उपलब्धतेबाबत निर्माण झालेल्या अडचणींमुळे शेतकरी वर्ग चिंतेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### शैक्षणिक प्रगतीचे परीक्षण करण्यात यावे

या आंदोलनात या आंदोलनात शिवसेना (उबाठा) उपनेते तथा संपर्क प्रमुख गुलाबराव वाघ, युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक निलेश चौधरी, उपजिल्हाप्रमुख महेंद्र महाजन, शहरप्रमुख भागवत चौधरी, नगरसेवक परमेश्वर जाधव, सुनील चौधरी, गोपाल महाजन, जितेंद्र न्हायदे, भीमराज धनगर, गजानन महाजन, विनोद रोकडे, सचिन चव्हाण, राहुल रोकडे, शुभम महाजन, भोला महाजन, हेमंत महाजन, महेंद्र राजपूत यांच्यासह शिवसैनिक, युवासेना, भारतीय विद्यार्थी सेना, अल्पसंख्याक संघटना आणि शेतकरी सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महागाईच्या विरोधात करण्यात आलेल्या या "मेलोडी चॉकलेट आंदोलनाने" धरणगावातील राजकीय व सामाजिक वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली असून, पारंपरिक आंदोलनांपेक्षा वेगळ्या पद्धतीमुळे अनेक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुकही केले.शिवसैनिक, युवासेना, भारतीय विद्यार्थी सेना, अल्पसंख्याक संघटना आणि शेतकरी सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

» Selected

## गुन्हेगारांची खैर नाही! जळगाव पोलिसांची जिल्हाभरात मोहीम

जळगाव : जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी आणि गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण करण्यासाठी जळगाव जिल्हा पोलिसांनी व्यापक मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीतील हिस्ट्रीशीटर्स, सराईत गुन्हेगार, टवाळखोर तसेच प्रतिबंधात्मक कारवाईतील आरोपींची संपूर्ण माहिती आता पोलिसांच्या एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. यासाठी पोलिस विभागाकडून 'क्रिमिनल डोजियर M.O.B (Modus Operandi Bureau) डेटाबेस' तयार करण्याची धडक मोहीम शनिवार, २३ मे २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत संबंधित गुन्हेगारांना थेट पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्याकडून सविस्तर 'इंटरोगेशन फॉर्म' भरून घेतले जात आहेत. अत्यंत बारकाईने तयार करण्यात आलेल्या या फॉर्ममध्ये गुन्हेगारांच्या वैयक्तिक, सामाजिक आणि आर्थिक माहितीचा संपूर्ण तपशील नोंदवला जात आहे.

# आभाळाकडे नजरा, शेतात धावपळ!

## खरीप हंगामाच्या तोंडावर धरणगाव परिसरात डिझेल टंचाई

जन सम्राट टाईम्स





**धरणगाव | प्रतिनिधी:** पावसाळ्याची चाहूल लागताच धरणगाव शहरासह परिसरातील ग्रामीण भागात खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. शेतकऱ्यांच्या शिवारात सध्या मोठी लगबग सुरू असून, कुठे ट्रॅक्टरच्या सहाय्याने मशागत सुरू आहे तर कुठे बी-बियाणे, खत आणि पेरणीपूर्व तयारीचे काम वेगाने सुरू आहे. मे महिन्यातच कपाशी लागवडीला गती मिळाल्याने संपूर्ण परिसरात शेतीची धामधूम पाहायला मिळत आहे. मात्र, या उत्साहावर आता डिझेल टंचाईचे संकट गडद होत असून बळीराजा चिंतेत सापडला आहे. यंदाच्या खरीप हंगामात तालुक्यात कापूस, मका, सोयाबीन, ज्वारी आणि बाजरीची मोठ्या प्रमाणावर लागवड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संभाव्य चांगल्या पावसाच्या आशेने शेतकऱ्यांनी आधीच बी-बियाणे, रासायनिक खते आणि आवश्यक शेती साहित्य खरेदी करून ठेवले आहे. अनेकांनी पेरणीपूर्व मशागत पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र शेतात मेहनत सुरू केली आहे. मात्र, या महत्त्वाच्या टप्प्यावर ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पेरणी यंत्र आणि इतर कृषी उपकरणांसाठी लागणारे डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण होत आहे. पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार शेतकरी करत आहेत. काही ठिकाणी मर्यादित पुरवठा होत असल्याने अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. "शेतात पेरणीची वेळ आली आहे, दिवस हातातून निसटत आहेत; पण ट्रॅक्टरला डिझेलच मिळत नाही. पंपावर तासन्तास उभे राहूनही डिझेल मिळाले नाही तर वेळेत शेतीची कामे कशी पूर्ण करायची?" अशी व्यथा धरणगाव येथील शेतकरी शिवाजीराव बाबुराव देशमुख यांनी व्यक्त केली. त्यांच्यासह बाभळे येथील गोकुळ जगन्नाथ पाटील, अजय तुकाराम माळी, पिंपळे येथील गोपाल संतोष पाटील, बांभोरीचे लक्ष्मण प्रभाकर पाटील, जांभोराचे नंदलाल माणिक माळी आणि महांकाळे येथील सिताराम ईश्वरलाल मराठे यांनीही प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. खरीप हंगाम सुरू होताच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधींनाही चालना मिळते. ट्रॅक्टर चालक, मजूर, शेती अवजारे दुरुस्ती करणारे कारागीर तसेच शेतीशी संबंधित लहान-मोठ्या व्यवसायांनाही याचा फायदा होतो. मात्र, डिझेल टंचाईमुळे या सर्व कामांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या आशा, अपेक्षा आणि कर्जाचे ओझे घेऊन बळीराजा नव्या हंगामाला सामोरा जात आहे. चांगला पाऊस पडेल, पीक भरघोस येईल आणि घरात सुखाचे दिवस येतील या आशेने शेतकरी शिवारात घाम गाळत आहे. मात्र, डिझेलअभावी ही स्वप्ने अधांतरी राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

### शेतीची कामे कशी पूर्ण करायची?

ट्रॅक्टर चालक, मजूर, शेती अवजारे दुरुस्ती करणारे कारागीर तसेच शेतीशी संबंधित लहान-मोठ्या व्यवसायांनाही याचा फायदा होतो. मात्र, डिझेल टंचाईमुळे या सर्व कामांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. पंपावर तासन्तास उभे राहूनही डिझेल मिळाले नाही तर वेळेत शेतीची कामे कशी पूर्ण करायची?" अशी व्यथा धरणगाव येथील शेतकरी शिवाजीराव बाबुराव देशमुख यांनी व्यक्त केली.

ग्रामीण अर्थचक्रावरही परिणाम डिझेल टंचाईचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नसून ग्रामीण अर्थचक्रावरही त्याचे सावट दिसू लागले आहे. खरीप हंगामामुळे मजूर, ट्रॅक्टर चालक, शेती अवजारे दुरुस्ती करणारे कारागीर तसेच शेतीशी संबंधित छोट्या व्यवसायांना रोजगार मिळतो. मात्र मशागतीची कामे रखडल्याने या सर्वांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. बाभळे येथील गोकुळ जगन्नाथ पाटील, अजय तुकाराम माळी, पिंपळेचे गोपाल संतोष पाटील, बांभोरीचे लक्ष्मण प्रभाकर पाटील, जांभोऱ्याचे नंदलाल माणिक माळी आणि महांकाळे येथील सिताराम ईश्वरलाल मराठे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने डिझेल पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी | ज

# धरणगाव परिसरात खरीप हंगामाची तयारी जोरात!

## मे महिन्यात कपाशी लागवडीला वेग



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** मान्सूनच्या पूर्वसंध्येला धरणगाव तालुक्यात खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून शेतकरी सध्या मशागत, पेरणी आणि खत व्यवस्थापनाच्या कामात व्यस्त झाले आहेत. विशेषतः मे महिन्यात कपाशी लागवडीला मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाल्याने ग्रामीण भागात शेतीकामांची लगबग वाढली आहे. यंदा तालुक्यात कपूस, मका, सोयाबीन आणि बाजरीची लागवड मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कपाशीचे बियाणे, खते आणि शेतीसाठी आवश्यक साहित्याचा साठा करून तयारी सुरू केली आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ट्रॅक्टर, रोटाव्हेटर आणि पेरणी यंत्रांची मागणी वाढली आहे. शेतकरी वेळेत मशागत पूर्ण करण्यासाठी शेतात दिवसरात्र मेहनत घेताना दिसत आहेत. मे महिन्यातच पूर्वमशागतीची कामे पूर्ण करून मान्सूनच्या सुरुवातीलाच पेरणी करण्याचा शेतकऱ्यांचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, शेतीकामांच्या या धावपळीत ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलची टंचाई शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. पेट्रोलपंपांवर वेळेवर डिझेल उपलब्ध होत नसल्याने मशागत आणि पेरणीची कामे रखडत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. "पेरणीची वेळ सुरू झाली आहे, पण ट्रॅक्टरला डिझेलच मिळत नाही. पंपावर तासन्तास थांबूनही डिझेल मिळत नसेल तर शेतीची कामे वेळेत कशी पूर्ण करायची?" अशी खंत धरणगाव परिसरातील शेतकरी राजू पाटील यांनी व्यक्त केली. ग्रामीण रोजगारालाही चालना खरीप हंगामाच्या तयारीमुळे ग्रामीण भागात मजुरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. पेरणी आणि शेतातील इतर कामांमुळे गावागावात आर्थिक हालचाली वाढल्याचे चित्र आहे. मात्र, डिझेल टंचाईमुळे शेतीच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांचा उत्साह कमी होताना दिसत आहे. प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने डिझेल पुरवठा सुरळीत करून पेट्रोलपंपांवरील समस्या दूर कराव्यात, अशी मागणी केली आहे.

### डिझेलटंचाईमुळे शेतकरी अडचणीत

मात्र, शेतीकामांच्या या धावपळीत ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलची टंचाई शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. पेट्रोलपंपांवर वेळेवर डिझेल उपलब्ध होत नसल्याने मशागत आणि पेरणीची कामे रखडत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. "पेरणीची वेळ सुरू झाली आहे, पण ट्रॅक्टरला डिझेलच मिळत नाही. पंपावर तासन्तास थांबूनही डिझेल मिळत नसेल तर शेतीची कामे वेळेत कशी पूर्ण करायची?" अशी खंत धरणगाव परिसरातील शेतकरी राजू पाटील यांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# भडगाव शहरात मान्सूनपूर्व नाले सफाईला वेग!

## नगरपरिषदेचे व्यापक स्वच्छता अभियान



जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर भडगाव नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नाले आणि ड्रेनेज सफाई मोहिमेला दि. २० मेपासून सुरुवात करण्यात आली आहे. पावसाळ्यात शहरात पाणी तुंबणे, सांडपाण्याचा अडथळा तसेच पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी नगरपरिषदेकडून विविध भागांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने सफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत. सफाई अभियानाची सुरुवात बाळद रोड परिसरातील ड्रेनेज सफाईपासून करण्यात आली आहे. मागील वर्षी पावसाळ्यात आलेल्या अडचणी लक्षात घेऊन यंदा सर्व प्रमुख नाले आणि ड्रेनेजची व्यापक स्वरूपात साफसफाई करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेकडून सांगण्यात आले. यांसह शहरातील कोल्हा नाला, ग्रीन पार्क नाला, टोनगाव नाला, यशवंत नगर नाला आणि शिवनेरी गेट परिसरातील मोठ्या नाल्यांची सफाई करण्यात येणार आहे. दि. २० मे ते ३ जून दरम्यान हे अभियान सातत्याने राबविण्यात येणार असून पुढील १५ ते २० दिवसांत जेसीबी आणि मनुष्यबळाच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम पूर्ण करण्यात येणार आहे. लोकनियुक्त नगराध्यक्षा रेखा प्रदीप मालचे यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष राजेंद्र महादू पाटील, गटनेते लखीचंद पाटील, आरोग्य सभापती इम्रान अली सय्यद यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच प्रभाग क्रमांक ८ मधील नगरसेविका समीक्षा लखीचंद पाटील, नगरसेवक अमोल नाना पाटील, प्रभाग ९ मधील नगरसेविका वैशाली विशाल पाटील, नगरसेवक विजयकुमार भोसले, प्रभाग १० मधील नगरसेविका ज्योती जितेंद्र पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते सौरभ राजेंद्र पाटील यांनीही सक्रिय सहभाग घेतला आहे.

### नागरिकांकडून समाधान व्यक्त

आरोग्य विभागाचे इंजिनिअर सत्यम पाटील, निशा लोट आणि क्लर्क छोटू वैद्य यांनी प्रभागनिहाय आराखडा तयार करून त्याची तातडीने अंमलबजावणी सुरू केली आहे. उर्वरित प्रभागांमध्येही लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून पावसाळ्यातील संभाव्य अडचणी दूर करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. या मान्सूनपूर्व नाले सफाई अभियानामुळे शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, पावसाळ्यातील संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी नगरपरिषद प्रभावी उपाययोजना करत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# जळगाव पोलिसांचा मोठा दणका; दोन अट्टल गुन्हेगारांना वर्षभरासाठी तडीपार

## निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कारवाई

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी :** शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी जळगाव पोलिसांनी दोन सराईत गुन्हेगारांविरोधात कठोर तडीपारीची कारवाई केली आहे. आगामी सण-उत्सव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिस प्रशासनाकडून देण्यात आली. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ५६ (१) अंतर्गत राम उर्फ सोनू भगवान सरवन (रा. गुरुनानक नगर, जळगाव) आणि विशाल मुरलीधर दाभाडे (रा. रामेश्वर कॉलनी, चांगापाचा मंदिराजवळ, जळगाव) या दोघांवर एक वर्षासाठी तडीपारीचा आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार दोन्ही आरोपींना दोन दिवसांच्या आत जळगाव जिल्ह्याबाहेर जाणे बंधनकारक करण्यात आले आहे. तडीपार करण्यात आलेल्या आरोपींपैकी राम उर्फ सोनू भगवान सरवन हा शनिपेठ



पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असून त्याच्यावर घरफोडी, दरोडा, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मारामारी यांसारखे १३ पेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वीही त्याच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आली होती. मात्र त्याने आदेशाचे उल्लंघन केल्याची नोंद आहे. तसेच एका श्वानावर अमानुष अत्याचार केल्याचा गंभीर प्रकारही त्याच्या विरोधात समोर आला होता. दुसरा आरोपी विशाल मुरलीधर दाभाडे हा एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असून परिसरात घातक शस्त्रांचा धाक दाखवत नागरिकांना धमकावणे, दुकाने फोडणे, घरफोडी करणे आणि दहशत निर्माण करणे अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग असल्याच्या तक्रारी होत्या. प्रतिबंधात्मक कारवाया करूनही त्याच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने पोलिसांनी अखेर तडीपारीचा निर्णय घेतला.

# रोटावेटरमध्ये अडकून तरुणाचा जागीच दुर्दैवी मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** यावल तालुक्यातील दहिगाव येथे शेतातील काम करताना झालेल्या भीषण अपघातात २८ वर्षीय तरुण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. योगेश यशवंत पाटील असे मृत तरुणाचे नाव असून, अवघ्या काही दिवसांवर त्याचा विवाह निश्चित झाला होता. या घटनेमुळे दहिगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून संपूर्ण गाव शोकमग्न झाले आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, दहिगाव येथील रहिवासी योगेश पाटील हा दुपारच्या सुमारास बबलू उर्फ शोभराज रमेश महाजन यांच्या मोहराळे शिवारातील शेतात ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटावेटरचे काम करत होता. काम सुरू असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली फेकला गेला. त्यानंतर सुरू असलेल्या रोटावेटरमध्ये अडकल्याने त्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर ट्रॅक्टर सुरू अवस्थेत पुढे जात शेजारील शेतात पोहोचला. परिसरातील एका तरुणाने हा प्रकार पाहताच धाव घेत ट्रॅक्टर बंद केला आणि तातडीने कुटुंबीयांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत योगेशला यावल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर गावात शोककळा पसरली असून मृतदेहाचे शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. यावल पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. विशेष म्हणजे, योगेशचा विवाह येत्या १८ जून रोजी निश्चित झाला होता. घरात लग्नाची तयारी जोरात सुरू होती. कपडे खरेदी, पत्रिका वाटप आणि लग्नाच्या तयारीत संपूर्ण कुटुंब व्यस्त असतानाच अचानक आलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# धरणगावात बेकायदेशीर फिल्टर प्लांटमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका

## 'वीणा' फिल्टर प्लांटवर परवानगीशिवाय पाणीपुरवठ्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव शहरात परवानगीशिवाय सुरू असलेल्या कथित "वीणा" फिल्टर प्लांटमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक परवानगी (NOC) तसेच BIS मानांकन नसतानाही हा प्लांट गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या प्लांटमधून पुरवले जाणारे पाणी पूर्णपणे शुद्ध न करता थेट नागरिकांना विकले जात असल्याचा दावा करण्यात येत असून, त्यामुळे अनेक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची तक्रार समोर आली आहे. दूषित पाण्यामुळे आजारांचा धोका



नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्लांटमधून पुरवठा होणाऱ्या पाण्यात घाण, दुर्गंधी आणि अशुद्धी आढळून येत आहे. "१५ ते २० मिनिटांत गावात पाणी पोहोचवले जाते, असे सांगून विक्री केली जाते. मात्र त्या पाण्याची गुणवत्ता तपासलेली नसल्याने नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे," अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली. स्थानिक प्रशासनाकडे तक्रार या संदर्भात स्थानिक प्रशासनाकडे तक्रार करण्यात आल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अवैध प्लांट बंद करण्याची मागणी नागरिकांनी संबंधित फिल्टर प्लांटची तातडीने तपासणी करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी, तसेच बेकायदेशीररित्या सुरू असलेला प्लांट त्वरित बंद करावा, अशी मागणी केली आहे. यासोबतच शहरात सुरक्षित आणि शुद्ध पाणीपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. धरणगावकर आता प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष ठेवून असून, या प्रकरणात निष्पक्ष चौकशी करून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न गांभीर्याने हाताळावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### दूषित पाण्यामुळे आजारांचा धोका

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्लांटमधून पुरवठा होणाऱ्या पाण्यात घाण, दुर्गंधी आणि अशुद्धी आढळून येत आहे. हे पाणी वापरल्यानंतर काही नागरिकांना पोटदुखी, उलटी, जुलाब आणि इतर पोटाच्या विकारांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. "१५ ते २० मिनिटांत गावात पाणी पोहोचवले जाते, असे सांगून विक्री केली जाते. मात्र त्या पाण्याची गुणवत्ता तपासलेली नसल्याने नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे," अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# गायरान जमीन घोटाळा प्रकरणी दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## बनावट दस्तऐवजांच्या आधारे सरकारी जमीन हस्तगत करण्याचा आरोप; पारोळा तालुक्यात खळबळ

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** पारोळा तालुक्यातील पिंप्री प्र.ऊ. शिवारातील गायरान (गुरचरण) जमिनीच्या कथित घोटाळ्याप्रकरणी दहा जणांविरुद्ध पारोळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाची दिशाभूल करून बनावट दस्तऐवज तयार करणे, खोटा मालकी हक्क दाखवणे आणि सरकारी जमिनीची बेकायदेशीर विक्री केल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पारोळा तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून गायरान जमीन प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पिंप्री प्र.ऊ. येथील गट क्रमांक १४० (सर्वे नं. ८४, ८५-अ आणि ८५-ब) ही गायरान जमीन असल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधितांनी संगनमत करून बनावट कागदपत्रे तयार केली आणि त्या आधारे खोटा मालकी हक्क दाखवून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच गायरान जमिनीवर अतिक्रमण करून नमुना ८-अ तयार करण्यात आला. त्यावर कथित खोट्या सह्या आणि शिक्के मारून सरकारी जमिनीची बेकायदेशीर विक्री करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले



आहे. या प्रकरणातील जमीन न्यायालयीन वादात असतानाही दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखत आणि गहाणखत नोंदणी करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच संबंधित जागेवर वित्तीय संस्थांकडून कर्ज उचलून आर्थिक फसवणूक केल्याचाही दावा करण्यात आला आहे. या प्रकरणी संशयित आरोपी म्हणून रामदास गुलाब पाटील, गोविंदा बाबुलाल पाटील, अरुणाबाई ब्रिजमोहन पाटील, ब्रिजमोहन बादशाह पाटील, मंगल भावराव पाटील, ज्ञानेश्वर विक्रम पाटील, उषाबाई शिवराम भिल, उषाबाई दत्तू पाटील, दत्तात्रय भिवसन पाटील आणि विलास तुकाराम पाटील (सर्व रा. पिंप्री प्र.ऊ., ता. पारोळा) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०११ ते २०१८ या कालावधीत बनावट दस्तऐवजांच्या आधारे जमीन हस्तगत करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर पंचायत विस्तार अधिकारी संजिव सैंदाणे यांच्या फिर्यादीवरून पारोळा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल दुकडे करीत आहेत.

### न्यायालयीन वाद सुरू असतानाही व्यवहार

खोटा मालकी हक्क दाखवून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच गायरान जमिनीवर अतिक्रमण करून नमुना ८-अ तयार करण्यात आला. त्यावर कथित खोट्या सह्या आणि शिक्के मारून सरकारी जमिनीची बेकायदेशीर विक्री करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील जमीन न्यायालयीन वादात असतानाही दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखत आणि गहाणखत नोंदणी करण्यात आल्याचा आरोप आहे.

# जनगणना करणाऱ्या सर्व प्रगणकांना ५० लाखांचे विमा संरक्षण द्या!

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** राज्यात सुरू असलेल्या जनगणना मोहिमेत कार्यरत सर्व प्रगणकांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने शासनाकडे केली आहे. जनगणनेच्या कामादरम्यान अकोला आणि लातूर येथे घडलेल्या दुर्दैवी घटनांचा उल्लेख करत संघटनेने ही मागणी लावून धरली आहे. भर उन्हात जनगणनेचे काम शासनाच्या वतीने सध्या जनगणनेचे काम सुरू असून विविध शासकीय कर्मचारी प्रगणक म्हणून कार्यरत आहेत. भर उन्हाळ्यात कर्मचारी घराघरांत जाऊन माहिती संकलनाचे काम करत आहेत. हे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. "जनगणनेचे काम हे राष्ट्रीय काम असल्याने हे कर्मचारी कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडले. त्यामुळे त्यांना एक प्रकारे शहीद मानले पाहिजे," असे मत त्यांनी व्यक्त केले. राज्यात जनगणनेचे काम करणाऱ्या सर्व प्रगणक कर्मचाऱ्यांना किमान ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. कामादरम्यान अपघात, उष्माघात किंवा इतर आपत्तीजन्य परिस्थितीत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक आधार मिळावा, शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असेही संघटनेने म्हटले आहे.